महासागर

मंगळवार, दि. 5 नोव्हेंबर 2024

अमरावती

पान 3

दुचाकी-ट्रकच्या धडकेत पोलिस कर्मचारी गंभीर

पथ्रोट - स्थानिक अंजनगाव रोडवरील एका पेट्रोल धर्मकाट्याजवळ वळण घेत असलेल्या पंपापुढील ट्रकला समोरून येणारी दुचाकी धडकली. या अपघातात पोलीसकर्मचारी गंभीर जखमी झाला. सदर घटना 3 नोव्हेंबरला रात्री सव्वाआठच्या सुमारास घडली. पांडुरंग गुरव (रा. कविठा) असे अपघातात जखमी झालेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

बंड, भारतीय, गुप्ता, ठाकरेंची बंडाळी कायम

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4) - उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी जिल्ह्यात अनेक ठिकाणी बंडखोरांनी भूमिका बदलेली असताना बडनेरा विधानसभा मतदारसंघात भाजपा आणि शिवसेना असे दोन उमेदवार, अमरावती विधानसभा मतदारसंघात भाजपाचा एक उमेदवार आणि मोर्शी विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा एक उमेदवार असे चार बंडखोर उमेदवारांनी भूमिकेवर ठाम आहेत. तिवसा आणि मेळघाट मतदारसंघातील भाजपाच्या बंडखोरांनी मात्र अखेरच्या क्षणी आपली उमेदवारी मागे घेतलीय. यामुळं आता बडनेरा विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या बंडखोर प्रीती बंड आणि भाजपाचे बंडखोर तुषार भारतीय यासह अमरावती विधानसभा मतदारसंघात भाजपातील बंडखोर जगदीश गुप्ता आणि मोर्शी विधानसभा मतदार संघात काँग्रेसचे पदाधिकारी विक्रम ठाकरे हे चार बंडखोर उमेदवार निवडणूक काळात चर्चेत राहतील. विशेष म्हणजे यांची भूमिका मतदारसंघात मोठी उलटफेर निर्माण करणारी ठरू शकते.

बडनेरा, अमरावती, मोर्शीमध्ये उलटफेरचे संकेत

माजी आ.प्रभुदास भिलावेकर यांचा उमेदवारी अर्ज मागे

चुरणी - मेळघाट विधानसभा मतदारसंघातील भाजपचे नाराज माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज भाजपचे उमेदवार केवल काळे यांच्या समर्थनार्थ वापस घेतला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माजी आमदार भिलावेकर यांच्या भुमिकेवर सर्च भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे विशेष लक्ष केंद्रित केले होते. आदिवासी भागाच्या राजकारणात महत्वपूर्ण भूमिका बजावणारे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांचा मोठा प्रभाव मतदारांवर आहे. त्यांच्या अपक्ष उमेदवारीमुळे भाजपचे सर्व राजकीय समिकरणे गडबडून गेली असल्यामुळे त्यांच्या अपक्ष उमेदवारीबद्दल भाजपच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये बराच खल झाला, अखेर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बडनेराचे आ.रवि राणा यांच्या मध्यस्थीने अखेर माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी भाजपच्या पक्षसंघटनेला आदिवासी भागातील राजकारणात आणखीन मजबूत करण्यासाठी आणि ग्रामिण भागातील भाजप कार्यकर्त्यांना एकत्रित करून भाजपचा उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वातोपरि प्रयत्न करणार असल्याचे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी सांगितले.

मोर्शी : 19 उमेदवार रिंगणात!

मोर्शी विधानसभा मतदार संघासाठी 33 उमेदवारांनी 43 नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. त्यापैकी तीन उमेदवारांचे चार नामांकन छाननी दरम्यान रद्द करण्यात आले होते. आज दि.4 नोव्हेंबर रोजी त्यापैकी 10 उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र परत घेतल्यामुळे आता केवळ 19 उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावत आहे. निवडणुकीच्या रिंगणात असलेल्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेश उर्फ चंदू यावलकर, भाजपा समर्थित राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गिरीश कराळे, अपक्ष विक्रम ठाकरे, जगदीश वानखडे (राष्ट्रीय विकास काँग्रेस पार्टी), रवींद्र सिरसाम (विकास इंडिया पार्टी), प्रवीण वानखडे (अपक्ष), जफरखान फतेखान (वंचित बहुजन आघाडी), कमलनारायण उईके (बहुजन समाज पार्टी), राजू फुके, सुहास ठाकरे, घोडस्कर बाजीराव (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), एड.राजू जामनेकर (जनवादी पार्टी), गोपाल बेलसरे (हिंदराष्ट्र संघ पार्टी), सुखदेव उईके (गोंडवाना गणतंत्र पार्टी), विपुल भडांगे, उमेश शहाणे, प्रमोद कडू, सुशील बेले (आझाद समाज पार्टी,कांशीराम) हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहे.प्रथमदर्शनी या मतदारसंघांमध्ये चौरंगी लढत होईल असे वाटत आहे. त्यामध्ये भाजपाचे उमेश यावलकर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गिरीश कराळे आणि वरुड पंचायत समितीचे माजी सभापती अपक्ष विक्रम ठाकरे यांचा समावेश आहे.

दहा उमेदवारांचे नामांकन मागे

सोमवारी 10 उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले असल्याने मोर्शी विधानसभा निवडणूक रिंगणात लढविणाऱ्या उमेदवाराची एकूण संख्या 19 राहिली आहे. सोमवारला दुपारी 3 वाजेपर्यंत उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र मागे घेतले असून यामध्ये अमित रामदासजी कुबडे, एड.आशिष शामरावजी वानखडे, नईम खा नूरमोहम्मद खा पठाण, डॉ.मनोहर गणपतराव आंडे, महेंद्र उत्तमराव भातकुले, राजेंद्र महादेव आंडे, विठ्ठल माधवराव कोल्हे, श्रीधर प्रभाकरराव सोलव, सौरभ श्रीरामजी मानकर, संजय दिगंबरराव खासबागे अशा 10 उमेदवारांचा समावेश आहे.

मच्छीसाथमधील घरात शॉर्ट सर्किटमुळे आग

अग्निशमन विभागाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.4)- बुधवारा परिसरातील मच्छीसाथ स्थित एका घरात सोमवारी दुपारी अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याने खळबळ उडाली होती. अग्निशमन दलाला माहिती मिळताच त्यांनी तत्परता दाखवून आग नियंत्रणात आणली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या आगीत 50 हजार रुपयांचे नुकसान झाले असून घरात ठेवलेले सुमारे 2 लाख रुपयांचे साहित्य वाचले आहे.

मच्छीसाथ परिसरातील रहिवासी प्रकाश पोहरे यांच्या घरात शॉर्टसर्किटमुळे दुपारी 12.32 वाजता आग लागली. आगीची माहिती तातडीने अग्निशमन दलाला देण्यात आली.

अग्निशमन विभागाचे सबस्टेशन प्रमुख सैय्यद अन्वर यांच्या आदेशानुसार अग्निशमन दलाचे जवान अमीन शेख आणि वसीम खान यांनी अग्निशमन वाहन क्रमांक 7507 घेऊन घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली. तोपर्यंत अंदाजे 50 हजार रुपयांचे नुकसान झाले होते. अग्निशमन विभागाने तत्परतेने केलेल्या कारवाईमुळे घरात ठेवलेली सुमारे दोन लाख रुपयांची स्टीलची भांडी वाचली आणि मोठी दुर्घटना टळली.

सिमकार्डचा वापर करून 1 लाख 7 हजाराने गंडविले

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.4) - मोबाईल चोरून त्यातील सिमकार्डच्या माध्यमातून एका इसमाच्या बॅक खात्यातून 1 लाख 7 हजाराची रक्कम चोरून फसवणूक करण्यात आली. याबाबतची तक्रार दत्तविजय पंजाबराव महले (59, रा. शामनगर, व्हीएमव्ही रोड) यांनी 4 नोव्हेंबर रोजी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

कोतवाली ठाण्यात गुन्हा दाखल

तक्रारीनुसार, दत्तविजय महले हे 31 ऑक्टोबर रोजी खरेदीकरिता मोची गल्लीत गेले होते. दरम्यान त्यांच्या खिश्यातील मोबाईल अज्ञात चोराने लंपास केला. याबाबत त्यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर त्यांनी गाडगेनगरातील एटीएममध्ये जाऊन बॅलन्स तपासले असता, त्यांच्या खात्यात 3 लाख 51 हजार 376 रुपये होते. त्यानंतर ते 1 नोव्हेंबर रोजी दिवाळीच्या कामात व्यस्त होते. त्यामुळे त्यांनी 2 नोव्हेबर रोजी मुलाच्या मोबाईलवरून चोरी गेलेल्या मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता, तो फोन सुरु असल्याचे दिसून आले. दरम्यान संबंधित अज्ञात चोराने दत्तविजय यांचे सिमकार्ड काढून पैसे ऑनलाईन ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे इंटरनेटच्या माध्यमातून माहिती पडले. त्यानंतर दत्तविजय यांनी एटीएमवर जाऊन पुन्हा बॅलेन्स तपासले असता, त्यांना बॅक खात्यातून 1 लाख 7 हजार रुपये ट्रान्सफर केल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती सायबर पोलिसांना दिली. त्यानंतर सिटी कोतवाली ठाण्यात तक्रार दिली.

गुटख्याची तस्करांकडून 2.73 लाख रुपयांचा माल जप्त

एसएसटी टीमची कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.4) - चांदूर बाजारच्या नानोरी नाका येथे एसएसटी पथकाने एका पिकअप वाहनातून गुटख्याचा 2 लाख 73 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या पथकाने विविध कंपन्यांचा गुटखा व वाहन असा एकूण 6 लाख 83 हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. सोमवारी सकाळी आठच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली.

विधानसभा निवडणुकीमुळे जिल्ह्याच्या सीमेसह तहसील स्तरावर नाकाबंदी लावण्यात आली आहे. दरम्यान एसएसटी पथकाने चांदूर बाजारातील नानोरी नाका येथे एमएच 47/ई 0747 क्रमांकाचे पिकअप वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यातून विविध कंपन्यांचा गुटखा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालाची किंमत 2 लाख 73 हजार 420 रुपये असून वाहनाची किंमत 4 लाख रुपये असा एकूण 6 लाख 83 हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. चालक रिजवान अहमद वाहेद खान (रा. संगम चौक, पेठपुरा, मोर्शी) याची चौकशी सुरू आहे. या कारवाईची माहिती अन्न व औषधी प्रशासनाला देण्यात आली. ही कारवाई एसएसटी टीम नानोरी फाटा विभाग प्रमुख अभिजित गुल्हाने, प्रवीण सोळंके व पोलीस कर्मचारी विशास भोयर यांनी केली.

श्री क्षेत्र वायगाव येथून यशोमती ठाकूर यांच्या प्रचार यात्रेचा शुभारंभ

आज सिद्धिविनायक मंदिर येथे फोडणार प्रचाराचे नारळ

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4) - ॲड. यशोमती ठाकूर या श्री.क्षेत्र वायगाव येथून प्रचाराचा मंगळवार दि.5 नोव्हेंबर रोजी सकाळी साडे आठ वाजता श्रीगणेशा करणार आहेत. सिद्धीविनायक मंदिर श्री क्षेत्र वायगाव येथे सकाळी अभिषेक करून ॲड. यशोमती ठाकूर प्रचाराचा नारळ फोडतील. पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या वायगाव येथून प्रचार यात्रेला प्रारंभ केल्यानंतर ॲड. यशोमती ठाकूर उद्यापासून प्रचाराला सुरुवात करतील.

महाविकास आघाडीच्या उमेदवार ॲड. यशोमती ठाकूर या तिवसा विधानसभा मतदार संघातुन निवडणूक लढवीत आहेत. सलग चौथ्यांदा त्या या मतदार संघातून विजयश्री मिळवतील असे वातावरण मतदार संघात आहे. मंगळवारपासून सुरू होणाऱ्या प्रचार यात्रेमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती असणार आहे. वायगाव येथून प्रचाराला प्रारंभ झाल्यानंतर तेथून आष्टी, टाकरखेडा, साउर ,पूर्णानगर या गावातून प्रचारयात्रा निघणार आहे. या दरम्यान ॲड. यशोमती ठाकूर या नागरिकांशी संवाद साधून मतदारांना मोठा विजय मिळवून देण्यासाठी आवाहन करणार आहे. ॲड. यशोमती ठाकूर यांनी तिवसा विधानसभा मतदार संघात मोठी विकासकामे केली आहेत. तिवसाच नव्हे तर जिल्ह्यात विकासाची गंगा आणणाऱ्या ॲड. यशोमती ठाकूरांना मोठया मताधिक्यांनी विजयी करण्यासाठी नागरिकांनी संकल्प केला आहे. आजपासून सुरू होणाऱ्या उमेदवारांच्या प्रचाराला केवळ पंधरा दिवस मिळणार असल्याने कमी वेळेत मतदार संघातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी ॲड. यशोमती ठाकूर यांचा प्रयत्न असणार आहे. या प्रचारयात्रेला परिसरातील तसेच मतदार संघातील नागरिकांनी तसेच महाविकास आघाडीच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. यशोमती ठाकूर यांनी केले आहे.

आठही मतदारसंघात 160 उमेदवार रिंगणात

88 उमेदवारांनी घेतले नामांकन मागे

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.4)- विधानसभा निवडणूकीत नामांकन परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी (दि.4) जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघातून 88 उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे अमरावती, बडनेरा, तिवसा, दर्यापूर, अचलपूर, मेळघाट, धामणगाव रेल्वे, मोर्शी या आठ मतदार संघात आता 248 पैकी 160 उमेदवार रिंगणात आहेत.

. तिवसा मतदारसंघात भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविराज देशमुख यांनी बंडखोरी करत अपक्ष नामांकन दाखल केले होते. त्यांनी माघार घेतली असून या बदल्यात त्यांना पक्षाने प्रदेश उपाध्यक्ष पद बहाल केले आहे. तर याच मतदारसंघातून प्रहार चे संजय देशमुख यांनी देखील माघार घेतली आहे. यासह अचलपूर मतदार संघात भाजपचे नंदकिशोर वासनकर आणि अक्षरा लहाने यांनी बंडखोरी करत अपक्ष नामांकन दाखल केले होते.

अमरावती मतदारसंघात- एकूण 29 उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते त्यापैकी सात उमेदवारांनी माघार घेतली असून 22 उमेदवार रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अप गट)सुलभा खोडके, काँग्रेसचे डॉ.सुनिल देशमुख, मनसेचे पप्पु पाटील आणि अपक्ष उमेदवार जगदीश गुप्ता यांच्यामध्ये लढत होण्याचे चिन्ह आहे.

मेळघाट मतदारसंघात- एकूण 24 उमेदवारांनी नामांकन दाखल केले होते.त्यापैकी 9 जणांनी माघार घेतली असून आता 15 उमेदवार रिंगणात आहेत. प्रहारचे राजकुमार पटेल, भाजपचे केवलराम काळे, काँग्रेसचे डॉ.हेमंत चिमोटे यांच्यात लढत होण्याचे चिन्ह आहे.

तिवसा मतदारसंघात- एकूण 36 उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी सर्वाधिक 20 नामांकन परत घेण्यात आले. त्यामुळे येथे आता 16 उमेदवार रिंगणात आहेत. काँग्रेसच्या एड. यशोमती ठाकूर आणि भाजपचे राजेश वानखडे यांच्यात थेट लढत होणार असल्याचे बोलले जात आहे.

अचलपूर मतदारसंघात- एकूण 30 नामांकन दाखल झाले होते. त्यापैकी 8 उमेदवारांनी माघार घेतली असून आता एकूण 22 उमेदवार रिंगणात आहेत. प्रहार चे बच्चू कडू चौथ्यांदा रिंगणात आहेत. त्यांच्या विरोधात काँग्रेसने जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. भाजपकडून प्रवीण तायडे व अपक्ष प्रमोदसिंग गड्रेल रिंगणात आहेत.

दर्यापूर मतदारसंघात- एकूण 32 नामांकन दाखल झाले होते. त्यापैकी 16 जणांनी माघार घेतली असून आता उर्वरित 16 उमेदवार रिंगणात आहेत. महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अभिजीत अडसूळ, भाजपचे माजी आमदार रमेश बुंदिले, शिवसेना ठाकरे गटाचे गजानन लवटे यांच्यात लढत होत आहे.

बडनेरात मतदारसंघात- 40 नामांकन दाखल झालेल्या बडनेरा विधानसभा मतदारसंघात सोमवारी नामांकन परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी 14 उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामूळे एकूण 26 उमेदवार रिंगणात आहेत. या मतदारसंघात युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा, महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुनील खराटे, शिवसेनेच्या बंडखोर अपक्ष उमेदवार प्रीती बंड, भाजपचे बंडखोर उमेदवार अपक्ष उमेदवार तुषार भारतीय, अपक्ष नितीन कदम रिंगणात आहेत.

धामणगाव रेल्वे मतदारसंघात- एकूण 28 नामांकन दाखल झाले होते, त्यापैकी चार उमेदवारांनी माघार घेतली असून आता 24 उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये भाजपचे प्रताप अडसड, काँग्रेसचे माजी आमदार वीरेंद्र जगताप, वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांच्यात लढत होणार आहे.

मोर्शी विधानसभेत- एकूण 29 नामांकन दाखल झाले होते. त्यापैकी दहा जणांनी माघार घेतली असून 19 उमेदवार रिंगणात आहेत. भाजपने येथून उमेश उर्फ चंदू यावलकर यांना उमेदवारी दिली आहे तर विद्यमान आमदार देवेंद्र भुयार पुन्हा एकदा राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या तिकिटावर रिंगणात आहेत. या दोन्ही महायुतीच्या घटक पक्षाविरोधात महाविकास आघाडीने काँग्रेस कडून गिरीश कराळे यांना उमेदवारी दिली आहे. तसेच अपक्ष विक्रम ठाकरे सुध्दा रिंगणात आहे. त्यामुळे हा मतदारसंघ कुणाला कौल देतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

अकोला येथून चोरीची दोन चारचाकी वाहने जप्त

दोघांना अटक, गाडगेनगर पोलिसांची कारवाई

महासागर प्रतिनिधी
अमरावती, (दि.4) - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरासमोरून चोरीला गेलेली अल्टो कार चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्या ताब्यातून दोन वाहने जप्त केली आहे. ही कारवाई गाडगेनगर पोलिसांनी केली.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्युत नगर येथील रहिवासी अनंत बंबल हसुनकर यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती की, त्यांची मारुती सुझुकी कार क्रमांक एमएच 31/सीएम 8947 घरासमोर उभी होती. त्यानंतर ती 29 ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आणि गुन्ह्याचा तपास सुरु केला. दरम्यान चोरीची कार पातूर मैदशी येथील सावरखेडा टोलनाक्यावरून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर हे वाहन शेख आसिफ शेख रफिक (42) यांच्याकडे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ पातूर येथे जाऊन शेख आसिफला शोधून काढले. पोलिसांनी या वाहनाची चौकशी केली असता शेख आसिफ याने सांगितले की, आपण हे वाहन शरद ऑटोमोटिव्ह गॅरेज, अकोला येथील आरोपी शरद शाम स्मित (नायर) याच्याकडून खरेदी केले होते. त्यामुळे पोलिसांनी तातडीने गॅरेजमध्ये जाऊन शरदला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या ओळखीच्या एका तरुणाने हे वाहन येथे विक्रीसाठी ठेवल्याचे सांगितले. त्यापैकी अल्टो कार शेख आसिफ शेख रफिक याला विकली होती. अल्टो कारशिवाय पोलिसांनी गॅरेजमधून टाटा सुमो गोल्ड क्रमांक एमएच 27/एआर 3763 ही गाडी जप्त केली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. , पोलिस निरीक्षक ब्रह्म गिरी, गाडगेनगर डी.बी.च्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक मनोज मानकर, नीलेश जुनघरे, गजानन बर्डे, संजय भिलये, सागर धरमकर, सुशांत प्रधान, मतीन शेख होते.

हॉटेलमधील दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात

वरुड येथे अन्न व औषधी प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

महासागर प्रतिनिधी
वरुड, (दि.4) - शहरासह तालुक्यातील हॉटेल व्यवसायिक तसेच टपरी चालविणारे सर्रासपणे अशुद्ध पाण्याचा वापर करीत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्भवला आहे. जलजन्य आजारांची शक्यता वर्तविण्यात येत आहे. जलशुद्धी उपकरण लावणे आवश्यक असताना अनेक हॉटेलमध्ये ते बंद अवस्थेत असल्याचे चित्र आहे. याची अन्न व औषधी प्रशासन विभागाकडून तपासणी होणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांचे आहे.

शहरात असलेल्या विहिरीतील पाणी पिण्यास अयोग्य असतानाही त्याच पाण्याचा वापर हॉटेल व्यावसायिक अन्य व्यापारी करतात. शहरात एखाद्या ठिकाणी पाण्याची बोंब असेल त्यावेळी विहिरीवरून पाणीपुरवठा केला जातो, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. हॉटेलमधील चवीचे खाद्य पदार्थ चहा आदी बनविण्याकरिता याच पाण्याचा वापर केला जातो. शिवाय नागरिकांना हेच पाणी पिण्यास दिले जाते. अनेकदा या पाण्यातून जंतू, चामडोक आढळून येतात. या हॉटेलमध्ये बनणारे पदार्थ हे चमचमीत आणि तेलकट असतात. यामुळे ते खाल्ल्यावर प्रत्येकालाच भरपूर पाणी प्यावे लागते. ग्राहकाने असे पदार्थ खाल्ल्यावर बिसलरीचे पाणी विकत घेऊन पिण्याचे ऐपत नसते, त्यामुळे अशा नागरिकांचे आरोग्य अधिकच धोक्यात येत आहे. काही हॉटेलमध्ये विहिरीच्या पाण्याचा पुरवठा केला जातो, परंतु सदर विहिरीचे पाणी निर्जंतुकीकरण अभावी अशुद्ध असते पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे सांगूनही ते पाणी पिण्यास वापरले जाते. तालुक्यातील हॉटेलमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. उच्च प्रतीच्या हॉटेलमध्ये शुद्ध पाण्याची बाटली विकली जाते. वरुड शहरात नव्हे तर ग्रामीण भागातही हॉटेलमध्ये शुद्ध पाणी असतेच असे नाही. किंबहुना बरेचदा ग्राहक पाणी विकत घेऊन पाणी प्यावे यासाठी म्हणून असे पाणी वापरले जात असल्याचेही वास्तव आहे.

अंबानगरीत 6 रोजी राज गर्जना

मनसे उमेदवार पप्पू पाटील यांच्या समर्थनार्थ राज ठाकरे यांची जाहीर सभा

महासागर प्रतिनिधी
अमरावती,(दि.4) - महाराष्ट्राची मुलूखमैदानी तोफ म्हणून प्रसिध्द असलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा ऐतिहासीक अशा अमरावती अंबानगरीत 6 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता स्थानिक सायन्सस्कोर मैदान येथे आयोजित करण्यात आली आहे.अमरावती विधानसभा मतदार संघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार पप्पू पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित या सभेमध्ये राज ठाकरे हे राज गर्जना करणार असल्याची माहिती पप्पू उर्फ मंगेश पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. राज ठाकरे यांच्या राजगर्जनेमुळे अमरावती विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण चित्र पालटून जाईल आणि एक वेगळी राजकीय परिस्थिती दिसेल असा दावा देखील पप्पू पाटील यांनी याप्रसंगी केला. राज ठाकरे हे विदर्भातून आपल्या प्रचार दौर्याचा प्रारंभ ऐतिहासीक अशा अंबानगरी अमरावती मधून करणार असून 6 नोव्हेंबर रोजी दुपारी त्यांचे अमरावतीत आगमन होईल. त्यानंतर अमरावती जिल्ह्यातील प्रमुख मनसे कार्यकर्ते व पदाधिकार्यां सोबत चर्चा करून मग ते सभास्थळी रवाना होतील. सायंकाळी 6 वाजता स्थानिक सायन्सस्कोर मैदान येथे आयोजित जाहीर सभेला ते मार्गदर्शन करणार असून या सभे नंतर ते रवाना होतील, अशी माहिती पप्पू पाटील यांनी दिली. राज ठाकरे यांच्या सभेला समस्त अमरावतीकरांनी तसेच मनसेचे कार्यकर्ते व पदाधिकार्यां नी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मनसे उमेदवार पप्पू पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.

ऐतिहासीक होणार सभा

मनसे प्रमुख राज ठाकरे यांची अमरावतीत होणारी सभा ऐतिहासीक होईल व सर्व रेकॉर्ड मोडीत काढेल, असा दावा पप्पू पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. या सभेला लाखो नागरिक उपस्थित राहणार असून सभेच्या नियोजनासाठी व यशस्वीतेसाठी मनसे कार्यकर्ते व पदाधिकारी कामाला लागल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक कालावधीत आचार संहितेचे काटेकोर पालन करावे

निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया

महासागर प्रतिनिधी
अमरावती,(दि.4) - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवारांना चिन्ह वाटप झाल्यानंतर आता प्रचार सुरू होणार आहे. उमेदवारांनी निवडणूक कालावधीत प्रचार करताना आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन अमरावती विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांची बैठक नवीन तहसिल कार्यालयात घेण्यात आली.यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. पुनिया यांनी, निवडणूक लढवित असलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन केले. चिन्ह वाटप करण्यात आल्यानंतर उमेदवारांना प्रचार करावा लागणार आहे. मात्र प्रचार करताना सर्व परवानगी घेऊन करावा. यासाठी मार्गदर्शक पुस्तिकाही देण्यात येणार आहे. उमेदवार अंतिम झाल्यानंतर प्रत्यक्ष मतपत्रिका कशी राहणार आहे, याचाही नमुना देण्यात येणार आहे. निवडणूक पारदर्शी पद्धतीने होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. निवडणुकीमध्ये प्रतिनिधी नेमताना त्यांना योग्य माहिती देण्यात यावी. त्यामुळे चुकीची माहितीवर प्रतिबंध घातल्या जाईल. निवडणुकीत 50 टक्के मतदान केंद्रांचे लाईव्ह टेलिकास्ट करण्यात येणार आहे. तसेच गृहमतदानाच्या प्रक्रियेमध्ये सर्व उमेदवारांनी उपस्थिती दर्शवावी. अमरावतीच्या निवडणुकीत 22 उमेदवार असल्याने दोन मतदान यंत्र राहणार आहे. मतदान प्रक्रियेबाबत उमेदवारांना वेळोवेळी सर्व माहिती उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. उमेदवारांना निवडणुकीसाठ 40 लाख रूपयांची मर्यादा असून या मर्यादेत खर्च करावा लागणार आहे. निवडणूकीत होणारा खर्च पथकास सादर करावा. तसेच मतदारांना कोणतेही प्रलोभने देण्यात येऊ नये. मतदारांनी मतदानासाठी पुढाकार घ्यावा, यासाठी उमेदवारांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. यावेळी उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या शंकाचे निरासन करण्यात आले. तसेच खर्च विषयक बाबींची माहिती देण्यासाठी व्यक्तिशः मदत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

संगीतमय सुंदरकांड पठणाचे आयोजन

महासागर प्रतिनिधी
दर्यापूर,(दि.4) - शिंगणापूर येथील श्री. काळा मारुती संस्थान येथे संगीतमय सुंदरकांड पाठाचे आयोजन करण्यात आले होते.

गायक अनमोल गुप्ता, अमन गुप्ता यांनी संगीतमय सुंदरकांडचे प्रभावी पठण केले, जे ऐकून श्रोते भक्तीभावाने भारावून गेले. 3 तास अखंड पठण करण्यात आले.. भाविकांना सुंदरकांडचे महत्त्व सांगताना पाठक म्हणाले की, या पठणामुळे माणूस अस्तित्वाच्या सागरात बुडतो. माणसाला आयुष्यात कधीही कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागत नाही. सुंदरकांड ऐकल्याने व्यक्तीचे आध्यात्मिक आणि शारीरिक ज्ञान विकसित होते. सुंदरकांड जगात सर्वत्र प्रसिद्ध आहे. पाठाच्या समारोपावेळी महाआरती होऊन प्रसाद वाटप करण्यात आला. या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन विमलाबाई बजरंगलाल झंवर, समस्त झंवर परिवार दर्यापूर यांनी केले होते.

नांदगाव खंडे. तालुक्यात डॉ.निलेश विश्वकर्मा यांचा झंझावती दौरा

शहापूर, कंझरा, सांतरगाव, माजरी म्हसला, एरंडगावात प्रचंड प्रतिसाद

महासागर प्रतिनिधी
नांदगाव खंडेश्वर (दि.4)-वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांचा झंझावाती दौरा सुरू असून तालुक्यातील शहापूर, कंझरा, मांजरी मसला, येरडगाव येथे त्यांना मतदाराकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. गेल्या पाच वर्षापासून नागरिकांच्या संपर्कात असल्यामुळे मतदाराही त्यांना कौल देत आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे दोन तालुके पिंजून काढले असून गेल्या दोन दिवसापासून नांदगाव खंडेश्वर तालुक्यात तळ ठोकून आहे. तालुक्यातील शहापूर, कंझरा, कवठा, सातंरगाव, मांजरी मसला व येरडगांव या गावात प्रचंड रॅली काढली असून मतदारांनी मोठ्या प्रमाणात त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे. डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी गेल्या पाच वर्षापासून मतदार संघाची सतत संपर्क ठेवल्याने जनतेनेही त्यांच्यावर एक प्रकारे विश्वास ठेवल्याचे बोलल्या जात आहे. कोरोना काळात केलेले कार्य व युवकांसाठी असलेली तळमळ पाहून मतदारांनी त्यांना प्रचंड प्रतिसाद दिला आहे. आजी-माजी आमदारांनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यात कुठल्याही प्रकारचा विकास केला नाही. नाली, रस्ता बनवून विकास होत नाही, मी एक खेळाडू आहे. मतदारांची माझी नाळ जोडलेली आहे, रेती तस्कर मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे. ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्ती आहे. शेतकऱ्यांचा मुलगाही आमदार होऊ शकतो अशी स्थिती मतदारसंघात निर्माण झाल्याने विरोधकांचे चांगले धाबे दणाणले आहे. सोयाबीनला भाव नाही, दोन हजार रुपयापर्यंत सोयाबीन विकल्या जात आहे. त्यामुळे शेतकरी यावर्षी चांगलाच तोट्यात सापडला आहे. लाडक्या बहिणीचे पंधराशे देऊन भावाची फसवणूक केली. महागाई दिवाळीच्या समोर मोठ्या प्रमाणात वाढवली, त्यामुळे आता बहिणींनी सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी पाऊल उचलले आहे. आजी-माजी आमदारांनी फक्त टक्केवारीचे राजकारण केले आहे. विकास मात्र शून्य आहे तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीची सुद्धा ती स्थिती आहे. शेतकऱ्यांना आपला माल ठेवण्यासाठी जागा नाही. आता या निवडणुकीत जनतेने दोघांनाही धडा शिकवण्यासाठी पावले उचलली आहे ज्या लोकांनी पिढ्यांना पिढ्या राजकारण केले मात्र जनतेच्या समस्या सोडवल्या नाही त्यामुळे जनतेने त्यांना आता धडा शिकवावा असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ निलेश विश्वकर्मा यांनी मतदारांना केले आहे.

दिवाळीच्या दिवशी महानायिकांचे पूजन

महासागर प्रतिनिधी
अंजनगाव सुर्जी,(दि.4)- दिवाळीत दिव्यांच्या ज्योतीने आयुष्याची वाटचाल प्रकाशमय होते. त्याहीपेक्षा ज्ञानाची वाट अधिक तेजोमय असते, या विचाराने प्रेरित असलेले अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहीगाव येथील सत्यशोधक विचारांचे दाम्पत्य अनिल व प्रफुल्लता खलोकार यांनी दिवाळीला महानायिका मॉ. जिजाऊ तथा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यांच्या जीवन कार्यावरील पुस्तकाचे वाचन करून दिवाळी पूजन केले. तत्पूर्वी जिजाऊ वंदना, सावित्री वंदना घेण्यात आली. सत्यशोधक विचारांची ही वेगळीच परंपरा अनेक वर्षांपासून हे दाम्पत्य अनिल खलोकर सत्यशोधक कार्यकर्त्याचा पुढाकार जोपासत आहे.

दिपावलीच्या दिवशी घुंगराची झुणझुण अन् ढोलकीची थाप!

रात्रीला पारंपारिक गवळण काढण्याची प्रथा

महासागर प्रतिनिधी
मोर्शी,(दि.4) - मोर्शी शहरात दिवाळीच्या पावन पर्वावर लक्ष्मीपूजन संपताच रात्रीलाच गवळणीच्या पायाच्या घुंगराची व ढोलकीची थाप ऐकू यायला लागल्याने तरुण युवकांचे मात्र चांगलेच मनोरंजन होते. दिवाळीच्या पाडव्याला काढण्यात आलेल्या गवळण नृत्याची परंपरा मोर्शीकरांनी आजही जपून ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा दिवाळीपासून 7 दिवस पारंपारिक पद्धतीने गवळण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

या गवळण सोहळ्याची सुरुवात मोर्शीच्या रामजीबाबा देवस्थान येथून करण्यात येत असते. या गवळणीमध्ये सर्व जाती, धर्मातील नागरिक सहभागी होतात. ही गवळण गावातून ढोलकी, तूनतूनी, बासरी, मंजीरा वाजवत दिवाळीचे गाणे एका सुरात गाऊन गवळण त्यावर ताल घरत नाचत असते. यावेळी गवळणीचे सोंग घेतलेले युवकसुद्धा चांगलाच ठुमका घेतात व नागरिकांचे मनोरंजन करतात. ही पारंपारिक गवळण मोर्शी शहरात दरवर्षीच आयोजित केल्या जाते. गवळण पाहण्याकरिता परिसरातील शेकडो नागरिक या ठिकाणी येतात. गवळण काढण्याचा उद्देश म्हणजे दिवाळीच्या पाडव्याला आपली संस्कृती टिकविणे तसेच समाज सुधारकांचे पोवाडे गावुन समाज प्रबोधन करणे, असा असून ही गवळण घरोघरी जाऊन नाचत, लोक गीत म्हणत सरते शेवटी लावा घरधन्याला कुंकवाचे बोट असे म्हणत घरधन्याला गवळणीच्या हाताने टीका लावून त्याच्याकडून बक्षीस घेतल्या जाते. गवळणीसोबत एक ढोलक्या, लोकगीत गाणारा गायक म्हणजे शाहीर व इतर सहकारी असतात. यामध्ये बासरी वाजवणारा युवक सर्वांचे आकर्षण ठरतो. विशेष म्हणजे ही गीते पुस्तकातली नसतात तर ती स्वत: तयार केलेली असतात.

मोर्शी येथील शाहीर तसेच बाहेर गावातील काही युवक महिलांचे वस्त्रधारण करून घरोघरी जाऊन नाचत गाजत सर्वांची मने जिंकत जातात. मोबाईलच्या युगात संस्कृती लोप पावत चालली असली तरी या गवळण व लोकनृत्याच्या माध्यमातून ही कला आजही ग्रामीण भागात जिवंत असल्याचे दिसून येते. दिवाळीच्या रात्री काढण्यात आलेल्या गवळणीच्या मागे शेकडो युवक सहभागी होत असल्याने शहरातील रस्त्यावर रात्रभर गर्दी पाहायला मिळते.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत

वरूड येथील विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार साहेब वरूड यांचे न्यायालयात

अर्ज क्र. ६३/२०२४ ने.ता. ३/११/२०२४

अर्जदार :- किसन साहेबराव उमाळे, रा. बेनोडा, ता. वरूड, जि. अमरावती

विरूद्ध

गैरअर्जदार :- ग्राम पंचायत सचिव पळसोना
पं.स. वरूड ता. वरूड. जि. अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार स्वत: नामे श्रीमती पत्नी अनिता नामदेवराव आहाळे यांचा जन्म दिनांक १०/०१/१९९२ रोजी रा. पळसोना ता. वरूड जि. अमरावती अमरावती येथे झाला असल्याची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे गैरअर्जदार कार्यालयाने कोर्टाच्या आदेशानुसार जन्म नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणीस अर्जदार स्वत: नामे श्री/श्रीमती यांचा शाळा जन्म दिनांक १०/०१/१९९२ रोजी रा. पळसोना ता. वरूड, जि. अमरावती येथे झाला असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाची असेल तरी त्यांनी दि. ३/११/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार साहेब, वरूड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फ हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिल्या जाईल.

आज दिनांक ३/१०/२०२४ रोजी माझेसहीने व न्यायालयाने शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

आदेशासार
विद्यमान तालुका
दंडाधिकारी तथा तहसीलदार वरूड